# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ११२ वा ❑ गुरूवार दि.१२ जून २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## लोकल ट्रेनमध्ये मृत्यूची संख्या का कमी होत नाही?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

मुंबईवरून कर्जत कडे आणि कसाऱ्याहून मुंबईकडे जाणाऱ्या जलद लोकल ट्रेनच्या दरवाज्यात लटकणारे प्रवासी परस्परांना धडकल्याने मुंब्रा झालेल्या भीषण अपघातात पाच प्रवाशांचा मृत्यू झाला तर नऊ जखमी झाले काहींची प्रकृती चिंताजनक आहे. मुंबईत झालेल्या लोकल ट्रेनच्या अपघातामुळे परत एकदा प्रवाशांच्या जीविताचा व सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.भारत सरकारच्या म्हणण्यानुसार, रेल्वे अपघातांमध्ये घट झाली आहे. त्यासोबतच मृतांची संख्याही कमी झाली आहे, पण मुंबईच्या ''जीवनरेषा'' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकल ट्रेनमध्ये मृत्यूची संख्या का कमी होत नाही? मुंबई लोकल ट्रेनवरील एका आरटीआयनुसार, ट्रेनमधून पडून ५७० लोकांचा मृत्यू झाला. त्याच वेळी, एनसीआरबीच्या आकडेवारीवरून असेही दिसून येते की महाराष्ट्रात १६.७% अपघात संध्याकाळी ६ ते ९ दरम्यान लोक ऑफिसमधून घरी जाताना होतात. तर १५.६% अपघात सकाळी ९ ते १२ दरम्यान लोक ऑफिस किंवा कामावर जातात तेव्हा होतात. मुंबईच्या लोकल ट्रेनमधील गर्दी कोणापासूनही लपलेली नाही. तरीही, कोणतीही कारवाई केली जात नाही.

५ जणांच्या मृत्यूनंतर, रेल्वे अधिकारी सांगत आहेत की सरकार प्रवाशांच्या सुरक्षेसाठी स्वयंचलित दरवाजे बसवणार आहे. प्रश्न असा आहे की हे काम आधी का केले गेले नाही? तर मृत्युची आकडेवारी सरकारकडे आधीच उपलब्ध आहे. २०२२ मध्ये एकूण २०७९२ मृत्यूंपैकी ३११० मृत्यू महाराष्ट्रात ट्रेनमधून पडून किंवा ट्रेनच्या धडकेमुळे झाले.

गेल्या काही वर्षांत मुंबईत लोकल ट्रेनची संख्या वाढली आहे. यासोबतच मुंबईत मेट्रो लाईनचाही सतत विस्तार होत आहे, परंतु रेल्वे अपघात कमी होताना दिसत नाहीत. सकाळी आणि संध्याकाळी गर्दीच्या वेळी ट्रेनने प्रवास करणे खूप धोकादायक बनते. टॅक्सी कॅबच्या किमती जास्त असल्याने लोक फक्त लोकल ट्रेनलाच प्राधान्य देतात. मुंबई दादर असो, वांद्रे, कुर्ला, अंधेरी, चर्चगेट असो किंवा बोरिवली-विरार रेल्वे स्टेशन असो, अशी गर्दी सर्वत्र ट्रेनमध्ये दिसून येते.

मुंबईत दररोज सुमारे ७५ लाख लोक लोकल ट्रेनमध्ये प्रवास करतात. मध्य रेल्वे मुंबई उपनगरात १८१० गाड्या चालवते, ज्यामध्ये ७० लाख प्रवासी दररोज प्रवास करतात. त्याच वेळी पश्चिम उपनगरीय १३९४ गाड्या चालवते, ज्यामध्ये ३५ लाख प्रवासी प्रवास करतात.

लाखो प्रवासी ट्रेनमध्ये प्रवास करतात, तर हजारो लोक रेल्वे अपघातात मृत्युमुखी पडले आहेत. मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या उत्तरानुसार, गेल्या २० वर्षांत रेल्वे अपघातात ५२ हजारांहून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. म्हणजेच दररोज ७ लोकांचा मृत्यू होतो. आकडेवारीनुसार, २०२३ मध्ये, रेल्वेतून पडून होणाऱ्या मृत्यूंमध्ये कल्याण (११४) अव्वल स्थानावर होते, त्यानंतर वसई (४५) होते. २०२४ मध्ये, कल्याणमध्ये पुन्हा सर्वाधिक मृत्यू (११६) नोंदले गेले, तर वसईमध्ये गेल्या वर्षी (४५) इतकेच मृत्यू झाले.

जर आपण देशभरातील रेल्वे अपघातांमध्ये झालेल्या मृत्यूंबद्दल बोललो तर गेल्या पाच वर्षांत सुमारे १ लाख लोकांचा मृत्यू झाला आहे. एनसीआरबीच्या आकडेवारीनुसार २०१९ नंतर रेल्वे अपघातांमध्ये मृत्युमुखी पडणाऱ्यांच्या संख्येत घट झाली आहे. २०१९ मध्ये २४६१९ मृत्यू झाले होते जे २०७९२ वर आले आहेत.

# डॉ. प्रमोद चौधरी लिखित 'पैलतीरावरून... तर असं झालं' या पुस्तकाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशन

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – भारताची भविष्यातील वाटचाल आणि कार्बनचे प्रमाण शून्यावर आणण्यासाठी आवश्यक वाटचालीचा रोडमॅप डॉ. प्रमोद चौधरी यांच्या पुस्तकातून मांडण्यात आला आहे. पुस्तकात मांडण्यात आलेले त्यांचे विचार आणि अनुभवांच्या बोलामुळे नवउद्योजकांना आणि देशासाठी काही करण्याची उर्मी असणाऱ्यांना प्रेरणा मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

डॉ. प्रमोद चौधरी यांच्या उद्योजकीय प्रवासावर आधारित 'पैलतीरावरून तर असं झालं' या पुस्तकाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, प्राज इंडस्ट्रिजचे अध्यक्ष व पुस्तकाचे लेखक डॉ. प्रमोद चौधरी, भारतीय मराठी साहित्य मंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रकाशक विकास सोनी, अतुल मुळे आदी उपस्थित होते.

डॉ. प्रमोद चौधरी यांच्यासारख्या नाविन्याचा ध्यास असणाऱ्या संशोधकाच्या पुस्तकाचे प्रकाशन करतांना आनंद होत असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, पुस्तकाचे सिंहावलोकन करतांना त्यांचे जीवन आणि संघर्षासोबत पुढच्या पिढीसाठी त्यांनी मांडलेले विचार महत्वाचे वाटतात. एखाद्या व्यक्तिचे व्यक्तिमत्व त्याच्या विचारातून लक्षात येते. पुस्तकातून डॉ. चौधरी यांच्या जगण्यातील मूल्ये कळतात, त्यांनी कठीण परिस्थितीतून मिळवलेले यश लक्षात येते. गुणवत्ता, तंत्रज्ञान, विश्वास आणि प्रामाणिकपणाच्या बळावर त्यांनी उद्योग क्षेत्रात यश संपादन केले.



पुस्तकातून २००९ ते २०१४ या संघर्ष काळातील उद्योगाची स्थिती मांडण्यात आली आहे. इथेनॉलच्या संदर्भात तत्कालिन प्रधानमंत्री स्व. अटल बिहारी वाजपेयी असतांना अनुकूल निर्णय घेण्यात आला. त्यानंतरच्या काळात आलेल्या संकटावर डॉ. चौधरी यांनी नवे उपाय योजून यशस्वीपणे मात केली. २०१४ मध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या काळात इथेनॉलबाबत अनुकूल धोरण लागू करण्यात आले. हे धोरण प्रभावी लागू करण्यासाठी डॉ. चौधरी यांच्या सुचनेनुसार त्यात आणखी चांगले बदल करण्यात आले आणि त्यातून २० टक्क्यापर्यंत इथेनॉलचे संमिश्रण करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यातून एकप्रकारे १ लाख कोटीपेक्षा अधिकचे परकीय चलन वाचवू शकत आहोत. या आत्मनिर्भरतेच्या स्वप्नाला तंत्रज्ञान आणि सहकार्य प्राजने पुरविले, अशा शब्दात श्री. फडणवीस यांनी डॉ. चौधरी यांच्या कार्याचा गौरव केला.

ते पुढे म्हणाले, टूजी इथेनॉलमुळे कृषी क्रांती शक्य झाली आणि शेतकऱ्यांचे सबलीकरणाकडे वेगाने वाटचाल सुरू झाली. साखर उद्योगासमोर आलेल्या अडचणी सोडविण्यासाठी नवे तंत्रज्ञान देण्याचे कार्य आणि साखर कारखानदारीपुढे नेण्यामागे प्राजचे प्रयत्न आहेत. साखर उद्योगावर आधारित लाखो शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी उपपदार्थ निर्मिती महत्वाची ठरली आहे. प्राजच्या माध्यमातून उप पदार्थांची अर्थव्यवस्था उभी राहिली आहे. स्वच्छ विमान इंधन निर्मितीतही प्राजने मौलिक योगदान दिले आहे. डॉ. चौधरी यांच्या प्रयत्नांमुळे सीबीजीचे धोरण ठरविण्यात मदत झाली. त्यातून नवीन अर्थव्यवस्था निर्माण होतांना दिसत आहे.

देशासमोर प्लास्टिकचे संकट फार मोठे आहे. अविघटनशील प्लास्टिकच्या विघटनाचे तंत्रज्ञान प्राजमध्ये तयार करण्यात येत आहे. याच्यावर आधारित उद्योग देशात उभे करण्यासाठी डॉ. चौधरी यांनी मार्गदर्शन केल्यास अर्थकारण आणि पर्यावरण दोन्हीसाठी उपयुक्त ठरेल, असा विश्वास श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला. डॉ. चौधरी यांचे हे राष्ट्रकार्य असेच सुरू रहावे, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या.

प्रा. जोशी म्हणाले, भाषा आणि उद्योग यांचा जवळचा संबंध आहे. जागतिक स्तरावर मराठी उद्योजक यशस्वी होतांना तो मराठी भाषेचा सन्मान असतो. कोणतीही पार्श्वभूमी नसतांना ग्रामीण भागातून आलेल्या चौधरी यांची ही यशकथा युवकांना प्रेरणा देणारी आहे. जैव इंधन आणि जैव वायुच्या क्षेत्रात डॉ. चौधरी यांनी बहुमोल योगदान दिले आहे. त्यामुळे खनिज इंधनावरचे देशाचे अवलंबित्व कमी झाले आहे. नाविन्याचा ध्यास धरणारे आणि काळाच्या पुढे पाहणारे ते द्रष्टे उद्योजक आहेत. तरुण पिढीच्या आशा आकांक्षा जागविणारे आणि त्यांना मार्गदर्शन करणारे हे पुस्तक असल्याचे त्यांनी सांगितले.

लेखक डॉ. चौधरी यांनी पुस्तकाविषयी माहिती दिली. ते म्हणाले, गेल्या काही वर्षात देशात जैव इंधनाच्या विकासाला गती मिळाली आहे. या विकासाचा ध्यास घेवून केलेल्या प्रयत्नांची माहिती पुस्तकात देण्यात आली आहे. यापुढील टप्प्यात जैव इंधनाचा अधिक उपयोग व्हावा यासाठी प्रयत्न करायचे आहे. शासनाकडून या दिशेने प्रयत्न होत आहेत. यामुळे कार्बनचे प्रमाण कमी करून पर्यावरणाला खूप मोठा फायदा होणार आहे. एनर्जी ट्रान्झिशनसाठी प्राजतर्फे प्रयत्न करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. श्री. सोनी यांनीही यावेळी विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाला आमदार सिद्धार्थ शिरोळे, हेमंत रासने, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आदी उपस्थित होते.

# श्याम दौंडकर लिखित 'धडपड भाग-३' या पुस्तकाचे प्रकाशन

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – ज्येष्ठ पत्रकार श्याम दौंडकर लिखित धडपड भाग-३ या पुस्तकाचे प्रकाशन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते जिल्हा परिषद सभागृहात आयोजित पुस्तक प्रकाशन कार्यक्रमात करण्यात आले.

पुस्तक प्रकाशन कार्यक्रमाला आमदार बापूसाहेब पठारे, आमदार शंकर मांडेकर, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष जालिंदर कामटे आदी मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. पवार यावेळी म्हणाले, धडपड भाग तीन या पुस्तकाचे लेखक श्याम दौंडकर यांची एक रिक्षा चालकापासून ते जिल्ह्यातल्या पत्रकारितेपर्यंतची वाटचाल नक्कीच खडतर होती. पत्रकार म्हणून त्यांनी अनेक वर्ष जिल्हा परिषद बीट सांभाळले असून त्यामुळे त्यांचा संपर्क वाढला, अनेक क्षेत्रातील लोकांशी त्यांचा संपर्क आला,



जिल्ह्याचे अनेक प्रश्न त्यांनी आपल्या लेखणीतून समाजासमोर मांडले, ग्रामीण भागातील समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला. ग्रामीण भागाची जाण असलेले पत्रकार म्हणून श्री. दौंडकर यांच्याकडे बघितले जाते. पुस्तक लिहीत असताना त्यांनी कोणतेही बंधन स्वतःवर घातले नाही, असे ते म्हणाले.

धडपड भाग-३ या पुस्तकात दिल्लीपासून ते गल्लीपर्यंतच्या गाथा त्यांनी सर्वांच्या समोर ठेवण्याचा, उलगडून दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. अत्यंत गरिबीतून ते पुढे आले असून त्यांनी स्वतःच्या हिंमतीवर कष्टाच्या व संघर्षाच्या जोरावर पत्रकारितेसारख्या बुद्धिवंतांच्या क्षेत्रात स्वतःचे आगळे वेगळे स्थान निर्माण केले आहे.

श्री. दौंडकर यांनी समाजातील वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांच्या लेखणीचा वापर केला असून त्यातून त्यांनी लोकांचे प्रेम आदर सन्मान मिळविला आहे. पुस्तक लिखाणाबद्दल त्यांना जिल्ह्याच्या जनतेच्या वतीने शुभेच्छा देऊन श्री. पवार यांनी पुस्तकाच्या प्रकाशकांचे सुद्धा अभिनंदन केले.

उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या हस्ते कार्यक्रमाच्या शेवटी धडपड भाग-३ पुस्तक देऊन मान्यवरांचा व महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत विशेष यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. राजेंद्र खांदवे पाटील यांनी आभार व्यक्त केले.

# सामाजिक कार्यकर्त्या संगीता ठलाल यांच्या पुढाकाराने वटसावित्री निमित्त वृक्षारोपण


**ज्योतिर्मय साहित्य**

**कुरखेडा** – श्रीरामनगर, वृंदावन कॉलनी कुरखेडा येथे दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुध्दा वटसावित्री पौर्णिमा निमित्त सामाजिक कार्यकर्त्या संगीता ठलाल यांच्या पुढाकाराने धमदीटोला येथील मोलमजुरी करणाऱ्या भगिनी, विधवा भगिनी सोबतच वृंदावन कॉलनी येतील सुहासिनी महिलांच्या उपस्थितीत करंजीचे रोपटं लावून वृक्षारोपणाचा उपक्रम राबवून वटपौर्णिमा सण साजरा करण्यात आला. सोबतच मोलमजुरी करणाऱ्या व विधवा महिलांना हळदकुंकू लावून त्यांच्या सोबत स्नेहबंधनाचे धागे विणण्यात आले. त्या शुभ प्रसंगी वृंदावन कॉलनी



येतील संगीता ठलाल, रेखा मोहणे, वैशाली कुमरे, तेजस्विनी कुमरे रामगढ येतील अश्विनी कोल्हे, धमदीटोला येथील अहिल्या कपूर, बेनू कपूर, मंगतीन कपूर, रेखा कपूर प्रामुख्याने उपस्थित होते.




## जात्यावरच्या ओव्या......

उगवले नारायण
उगवले किती दूर
बाळाला आऊक
मला जाण तिथं वर ||११७||

उगवले नारायण
उन ढवळं पिवळं
सोन्याच्या पालखीत
देव नेसले सवळं ||११८||

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# पर्यावरणाचे सदिच्छा दूत




ज्योतिर्मय साहित्य


सूर्योदवपूर्वी उठावेच. अनेशापोटी काही व्यायाम वा योगासने करावी. ट्रेडमिलवर व्यायाम करणे त्यांना मंजूर नाही कारण त्यासाठी विनाकारण विजेची नासाडी होती. त्यापेक्षा फिरायला जाणे हा सर्वोत्तम व्यायाम आहे. त्यामुळे निसर्गाचे सान्निध्यही लाभते. दिवसातून एखादा तास तरी थोडा घाम येईपर्यंत काही शारीरिक कष्टाचे काम करावे. त्यामुळे आरोग्य चांगले राहते. झाडं, माती, पालापाचोळा म्हणजे घाण नाही. जे बायो डिग्रेडेबल आहे त्यामुळे रोग होत नाहीत. माती, पालापाचोळा यांना रोज एकदा तरी हात लागलाच पाहिजे. घरात नैसर्गिक खेळती हवा आणि पुरेसा उजेड असावा. पंख्याची गरज भासू नये आणि गरज लागलीच तर अगदी कमीतकमी वापर करावा. ए सी चा वापर तर नकोच. माठातील पाणी प्यावे. फ्रीजचा वापर टाळावा. ताजे अन्न, फळे, भाजीपाला खावा. शक्यतो घरीच जेवावे. बाहेरचे खाऊ नये. प्रवासात जाताना सुद्धा दिलीपदादा आणि पौर्णिमाताई स्टीलचे ग्लास सोबत नेतात. त्यातच ते चहावाल्याकडून चहा घेतात.




चहासाठी कागदी वा प्लास्टिकचे मग वापरून पर्यावरणाची हानी करणे त्यांना मान्य नाही. दुपारी सूर्य डोक्यावर आला की जेवावं आणि संध्याकाळी अंधार पडण्याआधी जेवून घ्यावं. रात्र ही विश्रांतीसाठी आहे. दिसामाजी काहीतरी ते लिहावे या समर्थांच्या उक्तीचं ते पालन करतात. ते म्हणतात गरज आणि हाव यात आपल्याला फरक करता आला पाहिजे. निसर्ग आपल्या गरजा भागवू शकतो पण आपली हाव मात्र तो पुरी करू शकत नाही. आपल्या उत्पादन वाढीच्या आणि हावेच्या लालसेमुळे निसर्गाला आपण ओरबाडतो आहोत. पुढच्या पिढ्यांसाठी आपण काही ठेवणार आहोत की नाही ?

त्यांचं एकंदरीत वागणं आपल्यासारख्या शहरी जीवनमान अंगवळणी पडलेल्या लोकांना विचित्र वाटेल. उपभोगासाठी विविध वस्तूंचा संचय करणाऱ्या आणि त्यासाठी भरमसाठ पैसा खर्च करणाऱ्या आपल्यासारख्यांना त्यांची जीवनशैली पचनी पडणार नाही. पण हे लक्षात घ्यायलाच हवे की हे दोघे उच्चशिक्षित आहेत. केवळ मी पर्यावरणस्नेही वागून असा कितीसा फरक पडणार आहे असा विचार त्यांनी केला नाही. त्यांनी सुरुवात स्वतःपासून केली. गांधीजींचे फोटो लावून व्यासपीठावर त्यांच्यावर बोलणाऱ्या आपल्यासारख्या लोकांपेक्षा गांधीजींच्या तत्वांचे खरे अनुकरण या दोघांनी केले आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही.

या दोघांची आध्यात्माची बैठकही पक्की आहे. विचारांची बैठक पक्की आहे. एकदा ठरवले की ते निर्धाराने करतात. गेली पंचवीस वर्षे ते ही जीवनशैली जगत आहेत.अनेक मंडळी आवर्जून त्यांचं घर, त्यांची जीवनशैली पाहायला जातात. अशा व्यक्तींचंही ते स्वागत करतात. त्यांचे स्वप्नामधील गावा हे पुस्तक त्यांना असे जीवन जगताना आलेले अनुभव आपल्याला सांगते. *थेंबांनी जर भरते घागर, का उधळावा उगाच सागर* ? हे त्यांचे तत्वज्ञान आपणही एकदा जरूर विचार करावा असे आहे.






उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# पादसेवन भक्ति

ज्योतिर्मय साहित्य

दशक चौथा, समास चौथा

नमस्कार भगवंत भक्त मंडळी

लहानपणापासून माझ्या घरात श्री गणपतीची व गजानन महाराजांची भक्ति होत आहे. नंतर सासरी आडनावचं धर्माधिकारी म्हणजे पूजाअर्चा, आरती, कुळधर्म कुलाचार, सतत चालू असलेले कुलदैवत नरसिंहाला पवमानाचे अभिषेक अशा पवित्र वातावरणात असल्याने देवधर्म, देशकार्य, सतत पहातच आले आणि माझ्या मनीचा भक्तिचा मळा फुलत गेला।

संत कसा ओळखावा.

ज्याचा आचार, विचार, ऊच्चार भगवंताच्या प्रेमाने भरून वहातो तो संत होय. जागेपणी, झोपेत, सुखात, दुःखात, संपन्न अवस्थेत, आपत्तीत, एकांतात, समुहात तो भगवंता पासून वेगळा रहात नाही तो संत. एकीकडे भगवंताच्या दिव्य आनंदामध्ये डुंबत असलेला व दुसरीकडे प्राणीमात्रांचा मानवतेचा असीम कळवळा असलेला तो संत होय. अमूर्त परमात्मस्वरूपाची अखंड धारणा+मानवतेचा परमावधीचा विकास= सद्गुरू

अशा सद्गुरूपाशी निर्लेप आपलेपणा ठेवावा. हा देह त्याच्या सेवेत गुंतवावा आणि मन त्याच्याकडून येणाऱ्या सूचना ग्रहण करण्यास सदैव जागरूक ठेवावे. या तीन गोष्टी मनापासून केल्या की पादसेवन भक्ति घडते. पण तुमच्या माझ्या सारख्या प्रापंचीक माणसाला ही कठीण वाटते. कारण जगाच्या व्यवहार आपण कुटूंबाशी, समाजाशी बांधलेलो असतो. प्रपंचातील सर्व व्यवधाने सांभाळून भगवंताशी एकरूप होऊन त्याच्या वरील निष्ठा अखेल पर्यन्त निभावणे संसारात अनेकदा अनंत समस्या ऊभ्या रहातात पण भगवंत भक्तित एकरूप झालेला भक्त प्रत्येक समस्या हसतहसत स्विकारतो व आपली आयुष्यरूपी नौका पैलतीरावर नेतो ते भगवंताच्या पादसेवन भक्तिनेच. सद्गुरूसाठी कायेने, वाचेने आणि आपलेपणाने भगवंताची चरणसेवा म्हणजे पादसेवन भक्ति होय. **(क्रमशः)**



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

# नाम हाच भगवंताचा अवतार

ज्योतिर्मय साहित्य

आजच्या युगात नाम हाच भगवंताचा अवतार आहे. ‘‘सुष्टांचे रक्षण आणि दुष्टांचा नाश करण्याकरिता मी अवतार घेतो’’ असे भगवंतांनी गीतेत सांगितले आहे; त्यावरून असे ठरते की सुष्ट आणि दुष्ट या दोघांचेही अस्तित्व असून, त्यांत दुष्टांकडून सुष्टांना त्रास होण्यातच भगवंताच्या अवताराची उत्पत्ती आहे. आजकाल पाहू गेले तर असे दिसते की, सुष्टांचे अस्तित्वच जवळजवळ दुर्मिळ झाले आहे. म्हणजे, ज्यांचा छळ झाला असता भगवंताने अवतार घ्यावा, ते सुष्टच नामशेष झाले आहेत. मग अवतार तरी कुणासाठी, कसा व्हावा ? याचा अर्थ, अवतार होणारच नाही असे नाही; पण वस्तुस्थिती काय आहे ते यावरून आपल्याला समजेल. आजची परिस्थिती आणि पूर्वीच्या काळची परिस्थिती यांत फरक आहे. पूर्वी सद्वासना जिवंत होती, पण ती उघडपणे कृतीत आणणे कठीण होते. आता सद्वासनाच नाहीशी झाली आहे, म्हणजे पायाच ढासळला आहे, तिथे कृतीचा प्रश्नच उद्भवत नाही. पूर्वी सद्वासना सूक्ष्मपणे का होईना जिवंत होती, पण स्थूल प्रकट कृती दुर्घट झाली होती; त्या वेळी भगवंताला स्थूलात येऊन कार्य करणेच जरूर होते, आणि अशा वेळी अवतार घेऊन, म्हणजे सगुण रूप धारण करून, भगवंताने कार्य केलेही. आताचा प्रश्न, दुर्वासना जाऊन सद्वासना कशी उत्पन्न होईल हा आहे; म्हणजेच कार्य सूक्ष्मातले आहे. म्हणजे जसा रोग तसे औषध किंवा काटयाने काटा काढावा या न्यायाने, उपाययोजना सूक्ष्मातच केली पाहिजे. वासना बदलायला वासनेइतकाच जबरदस्त इलाज पाहिजे; आणि तो म्हणजे भगवंताचे नाम. चालू परिस्थितीशी झगडून मार्ग काढून देणारा असा जर कोणता अवतार असेल तर तो भगवंताच्या नामाचाच आहे, आणि त्याकरिता सर्वांनी भगवंताच्या नामाचा टाहो फोडणेच जरूर आहे. हे कार्य भगवंताने सगुणरूप धारण करून होणे कठीण आहे; ज्या अर्थी कारण सूक्ष्मातले आहे त्या अर्थी त्याला इलाजही सूक्ष्मांतला पाहिजे, म्हणून नामावताराची आज गरज आहे. प्रत्येक नामागणिक त्याचा अवतार आहे, आणि त्याची कास धरणे, म्हणजेच नाम घेणे, हे आमचे आजचे मुख्य कर्तव्य आहे. तेवढे केले की नाम आपले अवतारकार्य करून दाखवील. आपण आपले प्रेम प्रपंचाकडे लावले आहे, ते नामाकडे लावावे, म्हणजे नामस्मरणात फार आनंद येईल. मनाला नामाची चटक लागली आणि नामाच्या प्रेमातच मन रंगून गेले म्हणजे जन्म सफल झाला.

नामाने कलीची सत्ता नाहीशी होते. म्हणून नामधारकाला कलीची बाधा नाही.

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

# महात्म्यांचा अविर्भाव

ज्योतिर्मय साहित्य

सूर्यनारायणाचा अवतार असण्याचे कारण असे की, देव आणि राक्षस यांनी केलेल्या समुद्रमंथनातून जो अमृत कुंभ निर्मित झाला, त्या अमृताचे पान करण्यासाठी, सर्व देव तत्पर झाले. पण इतक्यात तो अमृतकुंभ राक्षसानी पळवून नेला. समुद्रमंथन हे सध्याच्या थायलंड या देशात हवाई या बेटावर झाले. तिथून तो अमृतकुंभ राक्षसांनी पळवून नेला आणि छत्रपती संभाजी नगरच्या जवळील, नगर रोडवर असलेल्या, नेवासा या ग्रामी तो अमृतकुंभ घेऊन सर्व राक्षस तिथे अमृत प्राशनासाठी जमले. दुष्प्रवृत्तीचे राक्षस जर अमृत घेतील तर दृष्ट लोकांना अमरत्व प्राप्त होईल असे होऊ नये म्हणून, भगवंतांनी मोहक अशा स्त्री रूपात येऊन युक्तीने राक्षसा कडून अमृतकुंभ परत मिळविला आणि त्यांना अमृता ऐवजी मदिरा पान करविले (ही घटना नेवासा इथे घडली. आजही तिथे मोहिनी राज चे सुंदर मंदिर आहे) भगवंताचा हा मोहिनी अवतार इतका मोहित करणार होता की, अनेक देव हे भगवंत आहेत हे न जाणून, ही किती सुंदर स्त्री आहे, हे समजून तिच्यावर मोहित झाले. प्रत्यक्ष महादेवही या मोहापासून सुटू शकले नाहीत. पण सूर्यनारायण मात्र या रूपाला मोहित झाले नाहीत. उलट त्यांना मोहिनी ही आपली कन्या आहे, असा ममत्वाचा विचार त्यांचे मनात आला. ब्रह्मदेव हे सर्व पहात होते, त्यांनी सूर्यनारायणाला अविचलपणे ममत्वाचा वर्षाव करताना पाहिले आणि त्यांना असा वर दिला की, तुझ्या पोटी प्रत्यक्ष श्रीकृष्ण लक्ष्मीच्या रूपात जन्म घेतील. या वरा प्रमाणे द्वापार युगात सूर्यनारायणाचा जन्म वृष भान या नावाने झाला तर श्रीकृष्णाचेच अंग असणाऱ्या लक्ष्मीचा, राधा रूपाने आविर्भाव झाला. राधाराणी हीच मूळ प्रकृती आदी माया जगदंबा आहे. राधा राणी ही नित्य प्रभूच्या सानिध्य गो लोकात वास्तव्यास असते. ती भगवंताची ल्हादिनी शक्ती होय.ब्रह्मवेवर्त पुराणात म्हणूनच श्रीकृष्ण आणि राधा यांना नित्य युगल म्हटले आहे. प्रत्यक्ष ब्रह्मदेव यांनी या दोघांचा विवाह भांडीरवट येथे लावून देताना असे म्हटले आहे की, तुम्ही तर नित्य युगल आहात,तुमचा तसा पुन्हा विवाह लाऊन देण्याची गरजच नाही. पण या मृत्यू लोकातील लोकांना समजण्यासाठी मी तुम्हा दोघांचा विवाह रीती प्रमाणे पुन्हा लावून देतो. आणि भगवंत आणि श्री राधा राणी हे शिशु असतानाच ब्रह्मदेवाने यांचा विवाह लावून दिला होता.

द्वापार युगात ज्यांच्याजवळ सर्वाधिक गाई असत तो त्या गावाचा प्रमुख म्हणून गणल्या जाई. रावल या गावावरून कंस भय असल्याने, हे कुटुंब आणि इतर लोक, रावल येथून बरसानाकडे स्थलांतरित झाले. बरसाना हे गाव एका पर्वताच्या शिखरावर वसलेले आहे. ऋषभान यांनी तिथे स्वतःचे घर बांधले आणि तेथून राज्यकारभार पाहण्यास सुरुवात केली. त्यांच्यानंतर श्री राधा राणी ही बरसानाची राणी म्हणून मान्यता पावली. राधा राणी ही स्वतःच लक्ष्मी असल्याकारणाने बरसाणा आणि सर्वच परिसराला वैभवाचे दिवस तिच्यामुळे आले. आजही बरासाणा इथे तिच्या घराच्या जागेवरच राधा राणीचे भव्य मंदिर उभे आहे.

श्री राधा राणी ही नित्य गोलोक धामात वास्तव्य करणारी आहे.

प्रभूच्या श्री दामा नावाच्या भक्ताने श्री राधेला शाप दिला की, तुझी आणि भगवंताची शंभर वर्षा करिता ताटातूट होईल. याच श्रापास, भक्ताचा मान राखावा म्हणून, द्वापार युगात श्रीकृष्ण आणि राधा हे सकृत दर्शनी विभक्त राहिले. श्री राधेचा विवाह अनय नावाच्या व्यक्तीशी झाला होता. अनय हा ही पूर्व जन्मी भगवत भक्त होता आणि त्यानेही पूर्वजन्मी भगवंता कडून वर प्राप्त करून घेतला होता की, माझा विवाह लक्ष्मीची होईल. त्यावेळेस वर देताना ब्रह्मदेवाने असे सांगितले की, तुझ्या तपश्चर्येच्या फळानुसार तुला वर देणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे द्वापार युगात कृष्ण जेव्हा अवतार घेतील, तेव्हा श्री राधा ही तुझी पत्नी होईल. पण तू नपुसक असशील. या रीतीने ची राधा राणी ही केवळ नाममात्र अनयाची पत्नी होती. श्री राधा राणी चा जन्म भाद्रपद शुक्ल अष्टमी, अनुराधा नक्षत्र, दुपारी बारा वाजता, सोमवारी झाला. या पावन दिवसाला राधाष्टमी म्हणून संबोधतात. ती भगवान श्रीकृष्णापेक्षा ११ महिन्याने मोठी होती. जन्मताच तिचे डोळे बंद होते, आणि भगवान श्रीकृष्णाच्या दर्शना नंतरच तिने डोळे उघडले, आणि त्यांना प्रथमच पाहिले. **(क्रमशः)**



## ॥ निरूपण ॥

ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**जगदम्ब नमस्तुभ्यं स्मितहासविलासिनि।**
**भक्तानां हर्षसन्तोषमोदकारिणि वत्सले ।। १६ ।।**

हे स्मितहासविलासिनी,जगदंबिके, तुला नमस्कार असो. भक्तांना हर्ष, संतोष आणि मोद करणारे, वत्सले तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं काञ्चनवृष्टिहेतवे।**
**जगदम्ब नमस्तुभ्यमाह्लादिनि नमो नमः।। १७ ।।**

सुवर्णवृष्टीसाठी, जगदंबे, तुला नमस्कार असो. आह्लादिनी, अशा जगदंबे तुला त्रिवार नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं देवि दानवनाशिनि।**
**नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं भक्तरक्षणहेतवे।। १८ ।।**

दानवांचा नाश करणारे, देवी, जगदंबे, तुला नमस्कार असो. भक्तरक्षणासाठीतुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं कोटिचन्द्रप्रभे नमः।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं कोटिसूर्यप्रभे नमः।। १९ ।।**

कोटीचंद्राप्रमाणे, प्रभा असणारे, जगदंबिके, तुला नमस्कार असो. कोटीसूर्याप्रमाणे प्रभा असणारे, जगदंबिके, तुला नमस्कार असो.




# ग्रीन कॉफी - आपल्या आरोग्यासाठी फायदेकारक

ज्योतिर्मय साहित्य

गेल्या काही वर्षात आपण ब्लॅक कॉफीविषयी अनेकदा वाचलं असेल. ब्लॅक कॉफी पिण्याचे फायदे आणि त्याचा आरोग्यावर होणारा सकारात्मक परिणाम याबाबत अनेकदा चर्चाही केली असेल.

मात्र गेल्या काही दिवसांपासून ग्रीन कॉफीची लोकप्रियता वाढू लागल्याचं चित्र निर्माण झालं आहे. अनेकजण ग्रीन कॉफीचा वापर आपल्या रोजच्या आहारात करत असून त्याचे आरोग्यावर अनेक चांगले परिणाम होत असल्याचे अनुभव येत आहेत.

**ग्रीन कॉफी म्हणजे काय?**

ग्रीन कॉफी तयार करण्यासाठी कॉफीच्या रोपांना येणाऱ्या हिरव्या रंगाच्या बियांचा वापर केला जातो. सर्वप्रथम हिरव्या बिया तोडून त्या वेगळ्या केल्या जातात. या बिया वाळवून त्याची पावडर तयार करण्यात येते. यालाच ग्रीन कॉफी पावडर असं म्हटलं जातं. ग्रीन कॉफीपासून अनेक फायदे मिळत असल्याचं दिसून आलं आहे. लठ्ठपणावर मात, उच्च रक्तदाब आणि इतर अनेक विकारांवर नियंत्रण मिळवण्यासाठीही ग्रीन कॉफीचा उपयोग होत असल्याचं दिसून आलं आहे. जाणून घेऊया, याचे नेमके कुठले फायदे आपल्या आरोग्यावर होतात.

**लठ्ठपणावर मात**

खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयीमुळे अनेकजणांचं वजन प्रमाणापेक्षा वाढलेलं असतं ग्रीन कॉफीमुळे शरीरातील फॅट्स वेगाने कमी व्हायला मदत होते. यात अँटिओबॅसिटी घटक मोठ्या प्रमाणात असतात. त्यातील मॅक्रो न्यूट्रिएंट्स आणि कार्बो हायड्रेट यांचं प्रमाणही लक्षणीय असतं. त्यामुळे पोट भरल्याची भावना निर्माण होते आणि वारंवार भूक लागत नाही. त्यामुळे ग्रीन कॉफी पिणारी व्यक्ती ही ओव्हरइटिंगपासून स्वतःचा बचाव करू शकते.

**रक्तदाबावर उत्तम उपाय**

एका रिसर्चनुसार ग्रीन कॉफीमुळे रक्तदाब नियंत्रित राहायला मदत होते. त्यामुळे रक्तदाबाच्या रुग्णांसाठी ग्रीन कॉफी वरदान मानली जाते. त्याचप्रमाणे ग्रीन कॉफीमुळे हार्ट अटॅक आणि क्रॉनिक किडणी फेल्युअरचा धोका कमी होण्यासही मदत होऊ शकते.

एनर्जी बुस्टर

ग्रीन कॉफीचा उपयोग एनर्जी बुस्टर म्हणूनही केला जातो. यात व्हिटॅमिन्स आणि मिनरल्स मुबलक प्रमाणात असतात. ग्रीन कॉफीत कॅफिनही असतं. त्यामुळे डोकेदुखीपासून बचाव होण्यासाठी ग्रीन कॉफीचा उपयोग होतो. ग्रीन कॉफीत असणाऱ्या कॅल्शिअममुळे हाडं मजबूत होण्यास मदत होते. त्याचप्रमाणे स्ट्रेस कमी करण्यासाठीदेखील याचा उत्तम उपयोग होतो.

**जेवणानंतर प्या कॉफी**

रिकाम्या पोटी ग्रीन कॉफी न पिण्याचा सल्ला दिला जातो. नाश्ता झाल्यानंतर किंवा जेवण झाल्यानंतर ग्रीन कॉफी घेतली, तर पचनक्रिया सुधारण्यासाठी आणि इतर कारणांसाठीदेखील त्याचा उपयोग होतो. भरल्या पोटी कॉफी घेतल्याने ॲसिडिटी होण्याचा धोकादेखील कमी होतो.

***

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९




ज्योतिर्मय साहित्य

खरे वैराग्य संतांजवळ असते कारण ते विवेकातून आलेले असते. स्माशनातून येताना वैराग्य येते.मैथुन नंतर ही ते येते. हे क्षण भंगूर असते. ज्यावेळी अंतःकरण मन बुद्धी ढळते त्या वेळी हे विचार वैराग्य आठवायला हवे. उत्तम वैराग्य विवेकातून येते.विवेक संतांजवळ असते.

चंद्र तेथे चंद्रिका, शंभू तेथे अंबिका.. यातही हे स्पष्ट होते. मनाच्या उपशमाचा विचार वशिष्ठानी सांगितला. मनाला देवाचा चरणी समर्पित करणे. त्यास आवरता यायला हवे. आपले मन कोठे धावू नये, मन स्थिर असावे या मनोनाश करणे गरजेचे असते..सरूप, अरूप मनोनाश असे दोन प्रकार आहेत.मनाला शांत,निश्पंद करायचे तर ज्ञानाने, संत संगती,योग,प्राणायाम या द्वारे करावे.माणसाचे जीवनाचे अधिष्ठान हे विचाराचे आहे. रणांगणात गीतेचा उपदेश देताना कृष्ण व अर्जुन हे कसे होते तर अस्थिर मनाचा कृष्ण म्हणजे अर्जुन, आणि स्थिर मनाचा अर्जुन म्हणजे कृष्ण. या दोघात देहाच्या शिवाय अन्य फारसा फरक नव्हताच. मनाच्या बोधा साठी संत वांगमय असते. विश्वामित्र सोबत राम व लक्ष्मण सोबत गेली. विश्वामित्रांनी रामास अनेक अस्त्रे दिली,शस्त्रे दिली जी भगवान शंकराकडून मिळविली होती. अस्त्रे मंत्र सामर्थ्यावर अवलंबून होते. विश्वामित्रांनी रामचंद्र प्रभूला ज्ञानसंपन्न केले. वसिष्ठानी प्रभु रामास ज्ञान दिले तर विश्वामित्रांनी त्यांना कर्माचे अधिष्ठान दिले. कर्माला निर्दोष ज्ञानाचे डोळे हवेत. ज्ञान आंधळे व कर्म दूषित हे उपयुक्त नाही. दोन्हीं असावेत. जीवनाची धन्यता ज्ञानाने होतेच, पण कर्मनिष्ठता नसेल तर जीवन निरर्थक होईल. **(क्रमशः)**

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

# फुलमाला....




रुईची फुले


पांढऱ्या, जांभळ्या रंगात फुलतात आकर्षक रुईची फुले,
गणपती, महादेवास वाहतात रूप यांचे आणखीन खुले..

जाड फिकट हिरवी पाने याची, शनी मारुतीला त्याची माळ घालती
विषारी तरी हे ...याच्या पाने,मुळे,चीक यांच्यात औषधी गुणधर्म असती..

रुईचा चीक लावताच पायात रुतलेला निघतो काटा,
रुईच्या पाना फुलांच्या झुडपांमुळे अनेक सजतात सुंदर वाटा..

सौ. माधुरी म.इनामदार, मिरज.





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

मागील दोन भागात रवींद्रनाथांनी लिहिलेली राजकीय आणि सामाजिक पत्रे आपण पाहिली. या भागात त्यांनी लिहिलेली वैयक्तिक पत्रे आपण पाहू. वेगवेगळ्या व्यक्तींना लिहिलेली ही पत्रे आहेत. त्यांची पत्नी मृणालिनी, त्यांची पुतणी इंदिरा आणि छोटीशी चिमुरडी- दहा वर्षांची राणू यांना आणि इतरही अनेकांना त्यांनी वेगवेगळ्या वेळी पत्रे लिहिली आहेत. त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक कंगोरे स्पष्ट होतात. या पत्रांमधून त्यांच्यातील महान तत्त्वज्ञ किंवा शिक्षणतज्ञ आपल्याला भेटत नाही तर एक सच्चा, साधा, प्रेमळ आणि दिलदार व्यक्ती म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन आपल्याला घडते. पत्नीला लिहिलेल्या पत्रातून त्यांच्यातील प्रेमळ पतीचे दर्शन होते तर इंदिरा त्याचप्रमाणे राणू यांना लिहिलेल्या पत्रातून त्यांच्यातील वात्सल्याचा वर्षाव करणारे पित्यासमान प्रेमळ हृदय दिसते. या सगळ्या पत्रांमधून आणखीही एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे त्यांचे निसर्गप्रेम. त्यांच्या प्रत्येक पत्रांमध्ये निसर्ग प्रतिबिंबित झाला आहे आणि त्याचे सुरेख दर्शन एखाद्या सजीव चित्राप्रमाणे शब्दांच्या माध्यमातून त्यांनी घडवले आहे. राणु हिला लिहिलेली ही पत्रे त्यांनी भानुसिंह या नावाने लिहिली. त्यांच्या पत्रांचा हा संग्रह भानुसिंहेर पत्रावली या नावाने प्रसिद्ध झाला आहे.

रवींद्रनाथ आणि राणू यांची भेट झाली त्यावेळी रवींद्रनाथ ५८ वर्षांचे होते तर राणू केवळ दहा वर्षांची. त्या सुमारास रवींद्रनाथांची कन्या माधुरीलता हिचे नुकतेच निधन झाले होते. आपल्या लाडक्या लेकीच्या निधनामुळे रवींद्रनाथ कमालीचे दुखी होते. त्यांच्या या दुःखावर मायेची हळुवार फुंकर घालण्याचे काम राणू या छोट्या चिमुरडीने केले. रवींद्रनाथांच्या साहित्याची ती मोठी चाहती, वाचक आणि अभ्यासकही होती. हीच राणू मोठी झाल्यावर कलकत्त्याच्या सांस्कृतिक चळवळीत एक मोठी प्रसिद्ध आणि कर्तृत्ववान व्यक्ती झाली आणि लेडी राणू मुखर्जी म्हणून ती ओळखली जाऊ लागली. राणूला रवींद्रनाथांनी भानुसिंह या नावाने जवळपास २०८ पत्रे लिहिली. तिला १० जुलै १९१९ रोजी त्यांनी शांतीनिकेतन मधून लिहिलेले हे एक पत्र. या पत्रातून रवींद्रनाथांचा दिनक्रम कसा होता ते आपल्यालाही कळते. त्यातून त्यांच्यातील आदर्श शिक्षक, निसर्गप्रेमी व्यक्तीचे दर्शन आपल्याला होते आणि आपण या भव्य आणि उदात्त व्यक्तिमत्वापुढे आपोआप नतमस्तक होतो. त्या पत्रातील काही भाग आपण पाहूया.

‘‘ राणू,

तू आज काल अभ्यासाच्या खूप मागे लागलेली दिसतेस. मीही अगदी चुपचाप स्वस्थ बसून असतो असे समजू नकोस. तुला ठाऊकच आहे की सकाळी मला तीन वर्गांना शिकवावे लागते. ते आटोपले की मी स्नान करून जेवायला बसतो. मग कोणालातरी पत्रे लिहायची असली तर ती लिहून टाकतो. दुपारच्या चहा फराळाला उठण्याचा निरोप येईपर्यंत दुसऱ्या दिवशी मुलांना जे धडे शिकवायचे असतील त्यांची तयारी करतो. संध्याकाळ झाली की गच्चीवर स्वस्थ बसून राहतो. माझ्याकडे कविता ऐकायला मुले येतात. त्यांना हव्या असलेल्या कविता वाचून दाखवतो. अंधार पडला की मुले घरी परततात. सारे आकाश चमचमणाऱ्या ताऱ्यांनी भरून गेलेले असते. देवेंद्रनाथांच्या घरात गाणे गात असलेल्या मुलाचा गोड आवाज कानावर येऊ लागतो.

रात्र गंभीर गंभीर होत चाललेली असते. मुलांचे गाणेही थांबलेले असते. गुडूप अंधार पडलेला असतो. दूर दूर गावातील रस्त्यातून एखाद दुसरा दिवा क्वचित मधून मधून लुकलुकत असतो. पुढे तेही दिवे रस्त्यातून जायचे बंद होतात. आकाशातील तार्यांच्या प्रकाशाशिवाय कुठेही प्रकाश नाही दिसत. मला झोप येऊ लागते. ती येऊ लागली की मी हळूहळू उठतो आणि झोपायला जातो. नंतर बऱ्याच वेळाने केव्हातरी पूर्वेकडील दरवाज्यातून दिसणारे आकाश अंधार फिकट होत जाऊन हळूहळू उजळू लागते. जवळपासच्या झाडात एखाद दुसरी सारिका खसपस करीत असते. ढगांवर सोनेरी छटा उमटू लागते. थोड्याच वेळात साडेचारच्या घंटेचे टोल ऐकू येऊ लागतात. मी उठून पूर्वे कडील गच्चीतील दगडी चौरंगावर आसन पसरून उपासनेला बसतो. सूर्य हळूहळू वर येऊन आपल्या प्रकाशाच्या स्पर्शाने मला आशीर्वाद देतो. आजकाल अगदी सकाळीच मला न्याहरीला बसावे लागते. कारण साडेसहा वाजता आश्रमातील सर्व बालक मंडळी विद्यालयाच्या समोरील मैदानावर एकत्र होते.

(क्रमशः)

# मोठ्या परिवाराचा लेखा-जोखा- ‘‘वास्तुपुरुष’’






पुस्तक परीक्षण

अरुण वि.देशपांडे- पुणे, 9850177342

ज्योतिर्मय साहित्य

रसिक हो नमस्कार,

एप्रिल महिन्यातील गोष्ट आहे. निमित्त होते पुण्यात २० एप्रिल २०२५ रोजी झालेल्या प्रज्ञा बहुउद्देशीय संस्थेच्या १२ व्या राज्यस्तरीय साहित्य संमेलनाचे. नागपुरच्या लेखिका गायत्री मुळे यांच्या वास्तुपुरुष या कादंबरीला प्रथम पुरस्काराने गौरविण्यात आले. या समूहाच्या साहित्य स्पर्धेतील एक परीक्षक म्हणून मी साहित्य संमेलनात उपस्थित होतो. समूह संचालिका सौ. लीना देगलूरकर यांनी ‘‘वास्तुपुरुष‘‘ ही कादंबरीची प्रत मला देत म्हटले ‘‘या कादंबरीचा परिचय करून द्या..! नंतरच्या सत्रात- लेखिका मधुर कुलकर्णी यांनी लेखिका गायत्री मुळे यांची ओळख करून दिली. एकाच वेळी दोन प्रसिद्ध साहित्यिक व्यक्तीमत्वे मला भेटली याचा आंनद झाला. प्रथम पुरस्कार प्राप्त ‘‘वास्तुपुरुष कादंबरीचा हा परिचय आपल्या सर्वांच्या अभिप्रायार्थ सादर आहे: मित्र हो- कादंबरी लेखन ‘‘ सहजतेने करणे, ही सहजसाध्य गोष्ट नाही. पण लेखिका गायत्री मुळे यांना मात्र ‘‘कादंबरी लेखन अगदी उत्तमपैकी जमते आहे.‘‘ या अगोदर प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या तीन कादंबऱ्या उदाहरण म्हणून वाचकांच्या समोर आहेत..

१. पानगळ - कौटुंबिक कादंबरी, २. पारो - सामाजिक कादंबरी, ३.परब्रह्म - अध्यात्मिक कादंबरी, या तीन कादंबरी म्हणजे त्यांच्या विविध लेखन विषयाची उदाहरणे आहेत. यात आता लक्षणीय अशी भर पाडणारी त्यांची नवीन कादंबरी- ‘‘वास्तुपुरुष ‘‘आपल्यापर्यन्त आली आहे. वास्तुपुरुष ही सामाजिक आणि कौटुंबिक आशय असणारी वाचनीय कादंबरी आहे. गायत्री मुळे यांच्या कादंबरी-लेखनाचे वैशिष्ट्य सांगायचे झाले तर : कादंबरीचे लेखन स्वरूप सामाजिक, कौटुंबिक, अध्यात्मिक,असे कोणत्याही प्रकारचे असो, ही लेखिका कथानकाला अतिशय सखोलतेने, विस्तारित करून आपल्या कादंबरीला वाचनीय बनवते.

प्रस्तुत ‘‘वास्तुपुरुष‘‘ ही कादंबरी अशीच आहे. वास्तुपुरुष‘‘ कादंबरी ,आणि या आधीच्या तिन्ही कादंबरी लिहून लेखिका गायत्री मुळे यांना‘‘ पुरस्कार-प्राप्त लेखिका‘‘ अशी ओळख मिळाली आहे. याचे कारण म्हणजे लेखिकेचे विशेष लेखन-गुण, सरस लेखन-शैली , कादंबरीला लाभलेला विशाल पैस, कथानकातील सहज - स्वाभाविक वाटणाऱ्या व्यक्तिरेखा. यामुळे वास्तुपुरुष ही एक वेधक -वाचनीय अशी साहित्य - कृती झाली आहे. ही कादंबरीही गायत्री मुळे या लेखिकेला अनेक साहित्य-पुरस्कार मिळवून देईल‘‘

हे नक्की.

मित्र हो- वास्तुपुरुष कादंबरीच्या आरंभी -

१.जेष्ठ साहित्यिका सुप्रिया अय्यर यांची प्रस्तावना,

२.जेष्ठ लेखिका-डॉ.प्रज्ञाताई आपटे यांच्या शुभेच्छा (यांचे शब्दांकन- डॉ.वसुधा वैद्य - नागपूर),

३. पाठराखण मजकूर ‘‘ लेखिका शुभांगी भडभडे- नागपूर.

वरील मान्यवरांनी आपापल्या मनोगतातून ‘‘वास्तुपुरुष‘‘ कादंबरीचे अंतरंग सविस्तारपणाने उलगडून देत, लेखिका गायत्री मुळे यांच्या लेखन - प्रतिभेचा उचित गौरव केला आहे.

लेखिका गायत्री मुळे यांचे मनोगत देखील लेखन प्रयोजनाचे महत्व अधोरेखित करणारे आहे. हे मनोगत वाचतांना लेखन समरसता कशी असावी ?, लेखन- प्रक्रिया म्हणजे नेमके काय ? लेखना दरम्यानची मनोवस्था कशी असते ? याबद्दल जाणून घेता येते. यावरून एक कळाले की लेखन म्हणजे खडतर साधना आहे, कठीण तपश्चर्या आहे.

मित्र हो-

२५५ पृष्ठांच्या ‘‘वास्तुपुरुष ‘‘ या कादंबरीचे कथानक दोन अध्यायात आहे.

पहिल्या अध्यायाचा आरंभ वास्तुपुरुष च्या निवेदनाने सुरू होतो.. (पृ..२१),

पृष्ठ ३५ - कादंबरीची नायिका कावेरी, आपल्याला पहिल्यांदा भेटते.

पृ.४८ - वास्तूचे मालक - विनायकशेट आपली ओळख करून देतांना कावेरी त्यांची तिसरी पत्नी आहे असे सांगतात.

इथून पुढे - पृष्ठ- ५२ ते १७१- या दीर्घ भागात कावेरी तिच्या शब्दात तिची भावनिक कहाणी सांगते.

पृ-१७२ ते २१६- अध्याय दुसरा - कावेरीच्या बहीण सिंधू- माझ्या मते ही या कादंबरीची सहनायिका आहे, तिची कहाणी वाचकांना हुरहूर लावणारी आहे. शेवटी - पृ- २१७ ते २५५- अखेरचा अध्याय-

यात पुन्हा एकदा निवेदकाच्या भूमिकेतून वास्तुपुरुष कथानकाचा शेवट करतो.

वास्तुपुरुष कादंबरीतील कथानक, त्याचा कालखंड, तत्कालीन पारिवारिक वातावरण, सामाजिक परिस्थिती, याचे यथायोग्य संदर्भ - वर्णन लेखिकेने प्रभावी केले आहे.

नायिका- कावेरी, सहनायिका-सिंधू, जमीनदार - सावकार - विनायक शेट, त्यांची बहीण-कमल.

कावेरीचे भावनिक आधारस्तंभ- मथुराबाई, आणि

अनंत, कावेरीचे काका-काकू, त्यांचा नातेवाईक असलेला अरुण. या सर्व व्यक्तिरेखा विविध भावनांच्या गडद रंगात आपल्याला भेटतात. त्यांच्या सहवासाची कहाणी ‘‘वास्तुपुरुष‘‘ आस्थेने सांगतो. म्हटले तर - कावेरी या विलक्षण स्त्रीच्या आयुष्याची कहाणी, जीवनाची झालेली परवड सांगणारी ही कादंबरी आहे. मानवी स्वभाव, वृत्ती, गुण आणि दुर्गुण यांच्या प्रभावाखाली ‘‘वास्तुपुरुष‘‘ मधील व्यक्तिरेखा या वावरतांना, वागताना दिसतात.

वाचकांना गुंतवून ठेवणारे कथानक ‘‘ हे वास्तुपुरुष‘‘ कादंबरीचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. या लेखना मागचे गायत्री मुळे या लेखिकेचे ‘‘लेखन-परिश्रम ‘‘ वाखाणण्यासारखे आहेत.

अशा वाचनीय लेखनाबद्दल लेखिका गायत्री मुळे यांचे अभिनंदन, व पुढील लेखन प्रवासास शुभेच्छा.

वास्तुपुरुष- कादंबरी
लेखिका - गायत्री मुळे
पृ- २५५, मूल्य- रु-३५०/-
संपर्क - ९७६७० ०८९७७
स्वयं प्रकाशन,
सोपान नगर, सासवड, जि. पुणे.
मुखपृष्ठ - गजेंद्र चंद्रशेखर-नागपूर.

## प्रत्येक पालकांसाठी हे खूप महत्वाचे...

पुस्तकी अभ्यास, विद्याभ्यास आणि कौशल्याभ्यास या तीनही वेगळ्या गोष्टी आहेत.आपल्या आयुष्यात या तीनही गोष्टी महत्त्वाच्या आहेत, हे मान्यच आहे. पण शाळेची सुट्टी ही पुस्तकी अभ्यासाची सुट्टी आहे, असं लक्षात घेऊन जीवनविद्या आणि कौशल्य विकास या दोन्हीं विकासांवर भर द्यायला हवा. जाणिवेच्या समृद्धीपासून ते प्रत्यक्ष कृतिशीलतेपर्यंतचा प्रवास व्हायला हवा. आपल्या संस्कृतीमधलं विज्ञान मुलांना समजायला हवं आणि विज्ञानातली नैतिक संस्कृती सुद्धा उमगायला हवी. खिशाला पटणं आणि मनाला पटणं यातला फरक नव्या पिढीला शिकवायला हवा.

पर्यावरणाच्या स्वास्थ्याला आणि राष्ट्रीय हिताला ज्या गोष्टी हिताच्या नाहीत, त्या कितीही आर्थिक मोबदला देणाऱ्या असल्या तरीही त्या नाकारण्याचं धैर्य मुलांमध्ये यायला हवं. महिन्याभराचा अनलिमिटेड डेटा पॅक मारुन घरात निवांत बसून सोशल मीडियावर वाट्टेल तसं व्यक्त होण्यात काहीही कर्तृत्व नाही, उलट ते लाज आणणारं लक्षण आहे, हेही घडवणं आता संस्कारांचा भाग झालंय. महापुरुषांचे विचार कृतीमध्ये आणण्यासाठी आणि अनुकरण करण्यासाठी असतात. डॉल्बी सिस्टिमपुढं नाचण्यानं ते विचार आपल्या व्यक्तिमत्वात येत नाहीत, हाही संस्कार आता नितांत गरजेचा झाला आहे. तरच 'आयुष्य म्हणजे इव्हेंट नसतो' हे पुढच्या पिढ्यांमध्ये रुजायला मदत होईल. म्हणूनच म्हणतो पालकमित्रांनो, उन्हाळी सुट्टीकडे बघण्याचा आपला दृष्टिकोन बदला. मूल घडवण्याचा खरा अभ्यासक्रम फार व्हास्ट आहे आणि त्यात उत्तीर्ण होण्यासाठी आपल्याला स्वतःलाच पाण्यात उतरावं लागेल. मुलांच्या पाठीशी नाही तर त्यांच्या सोबत राहावं लागेल. आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे ह्या सगळ्याला मानेवरचं जोखड न समजता स्वतः डेव्हलपमेंटल मेंटॉर होण्यातला आनंदसुद्धा मनसोक्त लुटला पाहिजे.

लक्षात घ्या,आपल्या मुलांना आपल्याच सक्रियतेची सगळ्यात जास्त गरज आहे. ती जबाबदारी आऊटसोर्स करता येणार नाही. केवळ जन्म दिल्यानं पालक होता येत नाही आणि शाळा, कोर्सेस, ग्राउंड, शिबिरं यांच्या फिया भरल्यानं संगोपन केलं असं म्हणता येत नाही. आपल्या मुलांच्या व्यक्तिमत्वाचं शिल्प अधिक देखणं घडवायचं असेल तर, शिक्षकांसोबत आपणही ती शिल्पकला शिकून घेणं गरजेचं आहे. टाकीचे घाव सोसल्याशिवाय मुलांना उत्तमपण येणार नाही अन् ते घाव आपणच घातल्याशिवाय आपलं पालकत्व सुफळ संपूर्ण होणार नाही.


पालकत्वाचं व्रत स्वतःच केलं तरच त्याचा लाभ आपल्या पदरी पडेल,अन्यथा....!

■



# इंदापूरी निखारे

## लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी...



ज्योतिर्मय साहित्य

मराठी भाषा दिनाच्या हार्दिक शुभेच्छा... मराठी भाषा दिन काही काही कार्यालयात साजरा केला गेला... आजच्या दिवशी फक्त मराठी भाषेचा वापर करायचा ठरवले... त्यामुळे झाले काय?

सकाळी सकाळी... म्हणजे अगदी रामप्रहरी...

ते दोघे नवरा-बायको... रिक्षातून उतरले आणि समोर कार्यालयाचे दृश्य पाहून...

मनावरील ताण क्षणात नाहीसा झाला...

अतिशय पवित्र शेणाने संपूर्ण परिसर स्वच्छ करून घेतलेला... सुंदर रांगोळीमुळे प्रवेश करताच प्रसन्न वातावरण जाणवत होते...

आरती सुरू होती... त्या पवित्र भावनेने ते भारावून गेले... नकळत भक्तिरसात टाळ्या वाजवत तेही सामावून गेले...

एका कर्मचाऱ्याने आदराने नमस्कार केला आणि स्थानापन्न होण्याची विनंती केली...

‘‘साहेब येतीलच आता. आपणास चहा वगैरे...‘‘

तेवढ्यात साहेब प्रसाद घेऊन आले...

त्यांनी आपल्या हस्ते सर्व कर्मचाऱ्यांना आणि भक्तांना प्रसाद दिला.. साहेब समोर खुर्चीवर बसले.

सुहास्य वदनाने नमस्कार करत म्हणाले...

महोदय, आपणास थोडा वेळ थांबावे लागले, त्याबद्दल क्षमस्व... आता आपण आपले म्हणणे मांडू शकता... आमचे कार्यालय २४ तास जनतेच्या तक्रारी आणि सुरक्षेसाठी तत्पर असते...

साहेब, खूप खूप धन्यवाद...

आपण इतक्या आपुलकीने चौकशी करत आहात, याबद्दल आम्ही आभारी आहोत...

आम्ही दोघे नवरा-बायको रोजंदारीवर काम करणारे... काल रात्री बायको एका लग्नसमारंभात मदतनीस म्हणून गेली होती... काम संपवून घरी येण्यासाठी बस थांब्यावर बसची वाट पाहत असताना... काही दूरचे नातेवाईक भेटले आणि जेवणासाठी आग्रह केला...

वयाने आणि मानाने वरिष्ठ असल्याने तिला नाकारता आले नाही... ते भोजनालयाच्या गच्चीवर गेले... तेथे शीतपेयात गुंगीचे औषध मिसळून तिला प्यायला दिले... त्यामुळे तिला आणि समाजाला घृणा वाटेल असे कृत्य त्यांनी केले...

गुंगीच्या अवस्थेमुळे तिला काहीच कळले नाही...

नंतर शुद्धीवर आल्यावर तिला त्या नीच कृत्याची जाणीव झाली...

त्या पाच जणांपैकी एकाने त्या घृणास्पद घटनेचे चित्रण केले... आणि आम्हाला पाठवले...

आता आपण मार्गदर्शन करावे...

ही नम्र विनंती...

नेहमीप्रमाणे सर्व कायदेशीर कारवाई सुरू झाली...

चौघांना अटक करण्यात आली आणि पुढील प्रक्रिया सुरू झाली... साहेबांनी अतिशय मृदू भाषेत विचारले... एक सल्ला द्यायला हरकत नाही ना? सर्वांनी होकार दिला... साहेब म्हणाले...

मी आतापर्यंतच्या अनुभवावरून तुम्हाला सल्ला देतो... कृपया याला बळजबरी असे समजू नये...

गैरसमज करुन घेऊ नका...

ज्यांनी हे कृष्णकृत्य केले आहे,

त्यांनी प्रत्येकी पाच-पाच लाख रुपये

आजच पीडित कुटुंबाला द्यावे...

हे मान्य करावेच लागेल...

नाहीतर कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल... सर्वांना हे मान्य झाले...

ते दोघे नवरा-बायको साहेबांच्या पाया पडले...

आपला आशीर्वाद कायम असावा...

अधूनमधून आम्ही आरतीला आलो, तर चालेल ना, साहेब?‘‘ ‘‘नक्कीच चालेल!‘‘ साहेब हसत हसत म्हणाले... साहेबांनी त्यांना थांबवले.

२० लाख दिले म्हणजे प्रकरण संपले असे वाटते का? अजून कारवाई बाकी आहे...

तुमच्या विरोधात तक्रार नोंदवली आहे...

आता उद्या देवाच्या दर्शनासाठी विमानाची तिकिटे आणि इतर सर्व खर्च करा... तुमचे पाप धुण्यासाठी! आणि दरवर्षी प्रत्येकाने दहा हजार रुपये या जमा करायचे...

कसे आणि कोठे, ते कळवले जाईल...

निघा आता!

तुम्हाला सन्मानाने जगता यावे म्हणून आम्हाला किती मेहनत घ्यावी लागते... याचा कधी विचार करता का?‘‘

थोड्या वेळाने मोठ्या कार्यालयात संपर्क साधला...

साहेबांना आनंदाची बातमी देण्यात आली...

एक तक्रार निवारण झाली...

फक्त मराठी भाषेचा वापर केला सर... अभिनंदन!

कोपऱ्यात बसलेला गडे दादा गदा गदा हसत होता ...

# यकृत प्रत्यारोपण केलेल्या मातेचे यशस्वी बाळंतपण

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – येथील कमलनयन बजाज रुग्णालयाने वैद्यकीय विज्ञान आणि रुग्णसेवेच्या क्षेत्रात आणखी एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. यकृत प्रत्यारोपण (लिव्हर ट्रान्सप्लांट) केलेल्या मातेला नुकतेच आरोग्यदायी बाळ सी-सेक्शनद्वारे सुरक्षितपणे जन्माला घालण्यात रुग्णालयाच्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमला यश आले आहे. हा प्रकार फारच दुर्मिळ आणि क्लिष्ट मानला जातो, कारण अशा परिस्थितीत गर्भधारणेचे आणि बाळंतपणाचे धोके




खूपच जास्त असतात. या प्रेरणादायी प्रवासाचे नेतृत्व डॉ. वेदत्रयी देशमुख यांनी केले. त्यांच्या कौशल्यपूर्ण मार्गदर्शनाखाली आणि टीमच्या निःस्वार्थ समर्पणामुळे आई आणि बाळ दोघांचीही प्रकृती बाळन्तपणामध्ये व प्रसूती दरम्यान उत्तम राहिली.

डॉ. वेदत्रयी देशमुख यांच्या नुसार ''ही केवळ वैद्यकीय यशोगाथा नाही, तर आशेचा आणि आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा संदेश आहे. ही शस्त्रक्रिया करताना या मध्ये डॉ. निखिल पाठक व डॉ. गौरव रत्नपारखी यांची मोलाची साथ मिळाली. योग्य नियोजन, तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन आणि टीमवर्क यामुळे हे शक्य झाले.''

कमलनयन बजाज रुग्णालय नेहमीच उत्कृष्ट रुग्णसेवा व नाविन्यपूर्ण वैद्यकीय उपचार देण्याच्या प्रयत्नात अग्रेसर असल्याचा आम्हाला अभिमान असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस यांनी सांगितले.

# आफ्रिकन लायन सफारी...(जंगल फेरी)

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

आपण सगळेच पालक लहानपणी मुलांचे वाढदिवस आले की त्यांच्या आनंदासाठी वेगळे आणि काहीतरी छान करण्याचा प्रयत्न करत असतो... त्यांना काय आवडते हे आपल्याला माहीत असते आणि शक्य असेल तेवढे आपण ते देतोच...तेच चक्र गोल फिरते.. आपले सांज वेळेचे वाढदिवस सुरू होतात... मुले मोठी झालेली असतात ती आता पालकांच्या भूमिकेत येतात आपल्या आई-वडिलांना काय आवडते हे त्यांना बरोबर कळते .आणि तोच आनंद ते भरभरून आता आपल्याला ती देतात..या वेळी माझा वाढदिवस १४ सप्टेंबर ला इकडे कॅनडात आला.. लेक आणि जावई आम्हाला लायन सफारीला घेऊन गेले... जंगलात आणि हिरवागार निसर्ग आणि मोकळ्या फिरणाऱ्या प्राण्यांच्या संगतीत जायचे हे ऐकूनच माझी उत्सुकता वाढलेली होती.

इथून एक तासाच्या अंतरावर असलेल्या लायन सफारीसाठी आम्ही दुपारी निघालो... तिथे साधारण पावणेतीन वाजता आम्ही पोहचलो... वातावरण खूप प्रसन्न होते, हवेत सुखद गारवा होता, छान सोनेरी किरणे आणि निळे आकाश होते.. आपल्या स्वतःच्या गाडीने सुद्धा ही सफारी करू शकतो.पण आम्हीं बसने जायचे ठरविले... कारण बसच्या खूपमोठ्या काचामुळे सगळे प्राणी,पक्षी अगदी जवळून बघता येतात आणि गाईड कडून त्यांच्याबद्दलची खूप छान माहिती ऐकायला मिळते. हिरव्यागार उंच झाडीतून वळणावळणाच्या रस्त्यावरून संथपणे आमची गाडी जात होती. हळूहळू माझ्या डोळ्यातले आश्चर्य आणि आनंद वाढत चालला होता.. कारण इतक्या प्रकारचे प्राणी मुक्तपणे बागडताना मी प्रथमच पाहत होते. आम्हाला लामाचा कळप दिसला. हा प्राणी चारी बाजूने बघू शकतो व एकदा खाली बसला की लवकर उठत नाही. अंगावर सुंदर ठिपके असलेला चिता आपली डौलदार शेपूट फिरवत आमच्या समोरून गेला.. तीन सिंहिणी दगडी कठड्यावर आरामात पहुडल्या होत्या.. दगडाच्या मागे एक सिंह आराम करत होता.. आयाळ फक्त सिंहाला असते... जंगलाचा राजा




असा सहज समोर आलेला बघून खूपच छान वाटले. काळवीट, रान गाई, आणि सुंदर हरिणांचे कळप मुक्त पणें बागडत होते.मधे मधे बदक आणि सीगल पक्षी उडत होते.उंच मानेचे सुंदर जिराफ बघून तर खूपच वेगळे वाटले कारण हा प्राणी चित्रात दिसतो त्याहून खूप सुंदर दिसतो.. जिराफ याचा अरबी भाषेतला अर्थ म्हणजे सुंदर होय.मध्येच बबून नावांच्या माकडांच्या टोळीने आमची वाट अडवली.. चार मोठे एकशिंगी गेंडे.... साधारण त्यांचे वजन दोन अडीच टन होते.. हे हे गेंडे आफ्रिकेकडून कॅनडाला मैत्री करार मध्ये मिळालेले होते. शहामृग ,झेब्रा ,कांगारू असे अनेक देशी-विदेशी मी तिथे प्राणी बघितले... त्या प्रत्येक प्राण्यांसाठी खास सोय केलेली होती.. काही प्राण्यांसाठी उंच झाडे.. काहींसाठी मोकळे पठार, छोट्या छोट्या टेकड्या.. हे सगळेच कसे स्वच्छ, सुंदर, हिरवेगार आणि त्यात निसर्गाची शोभा वाढवणारे हे अनेक प्रकारचे प्राणी... मला खूप वेळा पटकन गाडीतून उतरून त्यांच्यामध्ये मिसळावेसे वाटत होते.

नंतर आम्हीं बोटीतून खास छोट्या प्राण्यांसाठी केलेली बेटे आणि प्राणी बघितले..स्पायडर मंकी(त्याची शेपूट कोळ्याच्या जाळ्यासारखी असते) लिमर असे छोटे प्राणी आणि त्यांच्यासाठी बांधलेली घरे, झोपाळे बघितले. त्याच्या नंतर आम्ही पक्ष्यांचे सादरीकरण बघण्यासाठी गेलो. वेळेअभावी आमचे पोपटाचे सादरीकरण चुकले. मोकळ्या आवारात माहिती देणारी गाईड.. आणि तिने हाक मारताच उडत उडत येणारे पक्षी सगळेच वेगळे.. तिने लहान मुलांच्या बरोबर गिधाडांची पळण्याची शर्यत ठेवली होती ही बघताना खूप मजा आली..बहिरी ससाणा हवेत गोल गोल फिरतो आणि आपले लक्ष नाही असे दाखवतो पण मध्येच भक्ष आल्यावर सुरकन खाली झेप घेऊन चोचीत पकडतो त्याचे



प्रात्यक्षिक बघितले.. अशा अनेक वेगवेगळ्या पक्ष्यांना खास त्यांच्यासाठीची मोकळे उडण्याची सोय करून ठेवलेली जागा राखीव ठेवलेली आहेत.

नंतर पाण्यातील साप, मगर, कासव, मोठा अजगर यांचे प्रात्यक्षिके बघितली माहिती ऐकली त्यांचा सहज वावर बघितला.. सगळेच खूप कौतुकास्पद वाटले.. मोठे मोठे चार पाच हत्ती बघितले..त्यांच्यासाठी वेगळी सोय केलेली आहे.. हे सगळेच प्राणी आणि पक्षी मुक्तपणे वावरत होते. त्यांच्या गरजा, आणि त्यांची आवड लक्षात ठेऊन तशी प्रत्येकासाठी वेगवेगळी सोय केलेली होती.त्या प्राण्यांचा आणि त्यांच्या बरोबरचा माणसांचा सहज वावर बघून खूप आश्चर्य वाटत होते.अगदी छोट्या कीटकांपासून प्रत्येक प्राणी पक्षी आपापल्या परीने पर्यावरणाचे रक्षण करीत असतात. आणि त्यांचे रक्षण करणे आणि वाढविणे खूप गरजेचे आहे. प्राणी पक्षी यांच्या संवर्धन आणि योगदान यासाठी केलेल्या कामगिरीबद्दल या देशाला जगभरातील अनेक देशांकडून आणि संस्थेंकडून भरपूर पुरस्कार मिळाले आहेत आणि ते तिथे त्यांनी लिहून ठेवले आहेत.

मुळातच निसर्ग, प्राणी, पक्षी या सगळ्यांचेच मला वेड..आणि ते इतक्या जवळून आणि सुंदररित्या अनुभायला मिळाले आणि ते ही माझ्या वाढदिवसा दिवशी हा आनंद शब्दात न मावणार होता.. आता पुढच्या काही वाढदिवसांना तरी लेक, जावई, नात हे मला सहज शक्य भेटू शकणार नाहीत.. पण हा दिवस मात्र त्यांच्यामुळे नक्कीच लक्षणीय आणि स्मरणीय झाला. हे मात्र अगदी खरे.




# आनंदाचे ऋतुचक्र

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

आपल्या भवताली असलेली निसर्ग-दृष्टी ही आपली जीवनदायीनी आहे. निसर्ग सहवासात राहून पहा, एक नवी ऊर्जा मिळते, एक वेगळाच उत्साह मनाला आनंदीत करतो. आपल्या सांस्कृतिक जीवनात निसर्गाने अनेक उत्सव,सोहळे, विविध सण-वार '' असा सांस्कृतिक पारंपरिक ठेवा बहाल केला आहे. पिढ्या न पिढ्या, शतकानुशतके हे आनंद सोहोळे आपण साजरे करीत आहोत.

हे सांस्कृतिक सोहळे सर्वत्र वेगवेगळ्या नावाने, पद्धतीने संपन्न होत असतात, उद्देश मात्र एकच असतो, सामूहिक जीवनाचा आनंद घेणे. हे आनंद सोहोळे नसते तर आपल्या सगळ्यांचे आयुष्य, जगणे कमालीचे नीरस, बेरंग, होऊन गेले असते. वर्षाचे बाराही महिने आपण सण, उत्सव, सोहोळे साजरे करतो, यासाठी एकत्र येतो, यात खूप मोठा आनंद मिळवतो. एकत्र येऊन जो आनंद घेतला जातो, त्याची अनुभूती शब्दातीत आहे.

मित्र हो- आपले ऋतुचक्र, दिनमान विविधतेने नटलेले आहे . याची विविध रूपे मनाला थक्क करून सोडणारी आहेत. या आनंद-सोहळ्याची योजनाच इतकी विचारपूर्वक केली आहे की , याबद्दल आपण आपल्या सुज्ञ पूर्वजांचे आभार मानायला हवेत.

सांस्कृतिक दिन-दर्शिकेची ,कॅलेंडरची सुरुवात इंग्रजी महिन्याने - जानेवारी ते डिसेंम्बर अशी होते . भारतीय रितीप्रमाणे ,विशेषतः मराठी वर्षाची सुरुवात चैत्र महिन्यातल्या गुढी-पाडवा '', या पवित्र सणाने होते. काल-गणनेनुसार इंग्रजी महिने आणि आपले मराठी महिने यांच्यात दरवर्षी फरक पडतो, कधी अगोदर तर कधी नंतरच्या महिन्यात हे सण मागे-पुढे होतात. चालू वर्ष २०२५ च्या कॅलेंडरप्रमाणे प्रत्येक महिन्यात दर्शविलेल्या प्रमाणे महत्वाच्या - आनंद-उत्सवाच्या आठवणी करूया-

वर्ष -२०२५, मराठी वर्ष-शके-१९४६- १९४७

१. जानेवारी -(पौंष-माघ -शके १९४६)महिन्यात ''मकर संक्रांत ''महिला-वर्गासाठी मोठा उत्सव. याच पर्वात ''पतंग-उत्सव '' साजरा केला जातो.

२.फेब्रुवारी (माघ-फाल्गुन-) महाशिवरात्री उत्सव .

३. मार्च - (फाल्गुन-१९४६,चैत्र-शके- १९४७) गुढी-पाडवा, ४. एप्रिल ( चैत्र - वैशाख)- या महिन्यात अनेक दिनविशेष असतात- श्रीराम नवमी, भगवान महावीर जयंती, श्री हनुमान जयंती, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, अक्षय तृतीया.

५. मे - (वैशाख-जेष्ठ)- महाराष्ट्र दिन, कामगार दिन, मराठी राजभाषा दिन, बुद्ध पौर्णिमा.

६.जून - (जेष्ठ-आषाढ)- वट पौर्णिमा, आषाढ प्रथम दिन- महाकवी कालिदास जयंती. ७.जुलै- (आषाढ- श्रावण)- आषाढी एकादशी-पंढरपूर वारी, आषाढी पौर्णिमा- गुरू पौर्णिमा'', श्रावण - नाग पंचमी''. ८- ऑगस्ट- (श्रावण -भाद्रपद)- नारळी पौर्णिमा , रक्षा-बंधन, १५ ऑगस्ट-स्वातंत्र्य दिन, बैलपोळा,

हरतालिका, श्री गणेश चतुर्थी, ऋषी पंचमी.

९.सप्टेंबर- (भाद्रपद- अश्विन)- अनंत चतुर्थी, अश्विन मास आरंभ- नवरात्र उत्सव.

१०- सप्टेंबर- (अश्विन -कार्तिक)- दसरा, विजयादशमी, म. गांधी जयंती, कोजागिरी पौर्णिमा, दिवाळी-उत्सव.

११.नोव्हेंबर- (कार्तिक -मार्गशीर्ष)- कार्तिक पौर्णिमा, गुरू नानक जयंती ,

१२.डिसेंम्बर -२०२५- (मार्गशीर्ष -पौष- शके -१९४७)- श्री दत्त जयंती, ख्रिसमस-नाताळ.


मित्र हो- या निमित्ताने आपल्या आनंदयक

दिनक्रम, ऋतुचक्र यांची माहिती देता आली, याचा आनंद वाटतो.

# शिक्षण सर्वांनाच उपयोगाचं?

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

पुर्वीच्या काळी लोकं शिकत नव्हते असे नाही. त्यावेळेसही लोकं शिकत होते. म्हणूनच झाडावरुन माकड रुपातील माणूस नावाचा एक प्राणी खाली जमीनीवर आला. जमीनीवर येताच त्यानं स्वतःचं संरक्षण करण्याच्या तरतूदी शिकला. त्यानंतर पोट भरण्याचं साधन शिकला. ज्यात शिकार करणे, कंदमुळे खाणे व ते मिळवायचे कसे? या करतबी शिकला. त्यानंतर शिकार ही एखाद्या अवजारानं होते, याही गोष्टी तो शिकला व त्याबाबतीत विचार करतांना त्याच्या लक्षात एक गोष्ट आली, ती गोष्ट म्हणजे दगडांची अवजारे बनवणे. ती गोष्ट लक्षात येताच तो दगडापासून अवजारे बनवू लागला. त्यानंतर त्यानं लाकडाची अवजारे बनवली. त्यानंतर त्यानं प्राण्यांच्या हाडाची अवजारे बनवली. पुढं त्यानं तांबे, लोह व सोने या धातूचा शोध लावला. याचाच अर्थ असा की शोध लावण्याची प्रक्रिया ही आजची नाही. ती पुरातन काळापासून अस्तित्वात आली.




मध्यंतरीचा काळही असाच येवून गेला. या मध्यंतरीच्या काळात पुस्तक लिहिण्याची प्रक्रिया सुरु झाली. ज्यात वेगवेगळ्या स्वरुपाची शाही बनविण्याचं तंत्रज्ञान विकसीत झालं. त्यातच युद्धाच्याही गोष्टी केल्या गेल्या. ज्या अस्तित्व टिकविण्यासाठी आवश्यक होत्या. राजा असायचा व तो राजा आपलं राज्य टिकविता यावं म्हणून जागोजागी आपल्या सरदारांच्या माध्यमातून आखाडे तयार करायचा. ज्यातून तलवारबाजी, तलवारबाजीचे निकष, ज्यात स्वतःचं संरक्षणही शिकविलं जायचं. ते औपचारिकच शिक्षण असायचं.

या सर्व गोष्टी माणूस शिकला. हळूहळू शिकत गेला. काही लोकं हे औपचारिक पद्धतीनं शिकले. ते गुरुच्या आश्रमात गेले. काहींना परवानगी नव्हती शिकायची. म्हणूनच ते गुरु आश्रमात जावू शकले नाहीत. परंतु त्यांनी जे केही शिक्षण घेतलं. त्या शिक्षणाचा वापर त्यांनी पोट भरण्यासाठीच केला. म्हणजे शिक्षणाची खरी गरज आहे, पोट भरणे ही गोष्ट आपल्याला समजते. शेती व शेतीचं तंत्रज्ञान, पशुपालन व दुग्धजन्य पदार्थ तयार करणे, युद्ध व युद्धजन्य साहित्य तयार करणे, या साऱ्या गोष्टी माणूस शिकला. त्यातच पोट भरण्यासाठी माणूस जेव्हा जंगलात गेला. त्यावेळेस त्याला जंगली श्वापदांची भीती वाटत होती.

त्यातूनच प्राणी कसे माणसाळवायचे. याही गोष्टी तो शिकला. ज्यातून त्यानं कुत्र्यावर विजय मिळवला. ज्यातून त्यानं हत्ती, वाघ, सिंह, अस्वल यावर विजय मिळवला. एवढंच नाही तर सापावरही विजय मिळवला. आज आपण पाहतो की जी गारुडी समाजाची मंडळी असतात. ते सापाला पकडून गळ्यात टाकतात. फाप पाळतात आणि साप विषारी असूनही त्यांना काहीच करीत नाहीत. त्थाचं कारण त्यांना अवगत असलेलं ज्ञान. जे आपल्याला नाही.

**(क्रमशः)**

# भारताची आर्थिक क्रांती

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**
**(मागील अंकावरून)**

१४ शेतीतील नवोपक्रमामुळे अंगमेहनतीवरील अवलंबित्व कमी झाले आहे. अलिकडच्या वर्षांत, जागतिक आव्हानांना तोंड देताना भारतीय अर्थव्यवस्थेने लवचिकता दाखवली आहे. २०२५ पर्यंत, जानेवारी-मार्च तिमाहीत जीडीपी वाढ दरवर्षीच्या तुलनेत ६.७% पर्यंत वाढण्याचा अंदाज आहे, जो मागील तिमाहीत ६.२% होता. जागतिक अनिश्चिततेमुळे खाजगी गुंतवणूक कमी झाली असली तरी ग्रामीण वापरात सुधारणा आणि सरकारी खर्चात वाढ यामुळे ही वाढ झाली आहे.

१५ आंतरराष्ट्रीय नाणेनिधी च्या २०२५ च्या अहवालात भारतीय अर्थव्यवस्थेच्या या क्षमता स्पष्ट केल्या आहेत. हवामान बदल हा भारताच्या आर्थिक स्थिरतेसाठी एक महत्त्वाचा धोका म्हणून उदयास आला आहे, विशेषतः शेती आणि ग्रामीण उपजीविकेवर त्याचा परिणाम होत आहे. अनियमित मान्सूनचे स्वरूप, वाढते तापमान आणि तीव्र हवामान घटनांच्या वाढत्या वारंवारतेमुळे पीक उत्पादन आणि पाण्याच्या उपलब्धतेवर प्रतिकूल परिणाम झाला आहे.

१६ सरकारने शेतकऱ्यांना या प्रतिकूल परिस्थितींशी लढण्यासाठी आणि दृढतेने टिकून राहण्यास प्रशिक्षित केले आहे.

या पार्श्वभूमीवर, सरकारने हवामान-लवचिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी धोरणे अंमलात आणली आहेत. राष्ट्रीय शाश्वत कृषी अभियान सारख्या राष्ट्रीय हवामान बदल कृती आराखड्याअंतर्गत उपक्रम अनुकूलन क्षमता वाढवणे, शाश्वत पद्धतींना प्रोत्साहन देणे आणि अन्न सुरक्षा सुनिश्चित करणे यावर लक्ष केंद्रित



करतात.

१७ यामुळे शेतकऱ्यांना हवामान बदलाच्या परिस्थितीत प्रभावीपणे अनुकूल होण्यासाठी बळकटी मिळाली आहे.

भारतीय शेतीतील बदल

१९९० च्या दशकाच्या सुरुवातीपासून भारताच्या कृषी क्षेत्रात मोठे बदल झाले आहेत, ज्यात आर्थिक उदारीकरण, तांत्रिक प्रगती, जागतिकीकरण आणि अलिकडच्या काळात हवामान बदल यांचा समावेश आहे. या बदलांचा परिणाम केवळ उत्पादन पद्धती आणि पीक पद्धतींवरच झाला नाही तर ग्रामीण उपजीविका, बाजारपेठेतील संबंध आणि राज्य हस्तक्षेप यांच्या संरचनेवरही झाला आहे. भारताच्या ५०% पेक्षा जास्त लोकसंख्येसाठी प्राथमिक उपजीविकेचे साधन राहिलेल्या शेतीला राष्ट्रीय आणि जागतिक अर्थव्यवस्थेच्या बदलत्या दबावांशी जुळवून घ्यावे लागले आहे.

१९९१ च्या आर्थिक सुधारणांनंतर, भारतीय शेतीमध्ये एक मोठा बदल झाला. अर्थव्यवस्थेचे उदारीकरण मुख्यत्वे औद्योगिक आणि सेवा क्षेत्रांवर केंद्रित होते, तर व्यापार धोरणातील बदल,







अनुदानात कपात, व्यापारीकरणावर अधिक भर आणि जागतिक बाजारपेठेत एकात्मता यामुळे शेतीवरही अप्रत्यक्षपणे परिणाम झाला. कृषी आयातीवरील परिमाणात्मक निर्बंध कमी करून आणि निर्यातीला प्रोत्साहन देऊन, भारतीय शेतकऱ्यांना स्पर्धात्मक किंमत, आंतरराष्ट्रीय गुणवत्ता मानके आणि अस्थिर बाजार परिस्थितीची ओळख करून देण्यात आली.

राष्ट्रीय कृषी धोरण (२०००) लागू झाल्यामुळे उत्पादन-केंद्रित मॉडेलपासून उत्पन्न-केंद्रित मॉडेलकडे वळण्यास प्रोत्साहन मिळाले, ज्यामध्ये विविधता, खाजगी गुंतवणूक आणि संसाधनांचा शाश्वत वापर यावर भर देण्यात आला. त्यामुळे कंत्राटी शेती, सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी) आणि कृषी-व्यवसाय मॉडेल्सना प्रोत्साहन मिळाले. उत्पन्न सुरक्षा वाढविण्यासाठी शेतकरी तांदूळ आणि गहू यासारख्या पारंपारिक धान्य पिकांपासून दूर उच्च-मूल्याच्या फलोत्पादन, फुलशेती, मत्स्यपालन आणि पशुपालनाकडे वळू लागले १८. तंत्रज्ञान, नवोपक्रम आणि पायाभूत सुविधांच्या विकासामुळे शेतीतील नवीन बदलांशी जुळवून घेण्यास फायदा झाला आहे. तथापि, या सुधारणांनी नवीन संधी उघडल्या असताना , त्यांनी शेतकऱ्यांना आंतरराष्ट्रीय किमतीतील चढ-उतारांच्या अनिश्चिततेशी देखील सामोरे जावे लागले. लहान आणि सीमांत शेतकरी अनेकदा उदारीकृत बाजारपेठेत स्पर्धा करण्यास असमर्थ असल्याचे आढळले, त्यामुळे संस्थात्मक आधार, पीक विमा आणि किमान आधारभूत किमती (एमएसपी) वर पुन्हा लक्ष केंद्रित करणे आवश्यक झाले.

उदारीकरणानंतरचा काळ भारतातील हरित क्रांतीचा दुसरा टप्पा होता. १९६० आणि १९७० च्या दशकात झालेली सुरुवातीची हरित क्रांती पंजाब, हरियाणा आणि पश्चिम उत्तर प्रदेश सारख्या काही राज्यांपुरती मर्यादित होती, परंतु अलीकडील तांत्रिक प्रगतीचा व्यापक भौगोलिक परिणाम झाला आहे. जैवतंत्रज्ञान, सुधारित सिंचन तंत्रे (जसे की ठिबक आणि शिंपडण्याची प्रणाली), सौरऊर्जेवर चालणारी उपकरणे आणि डिजिटल साधने यांनी कृषी पद्धतींमध्ये लक्षणीय बदल केले आहेत.

***

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559